दि.०४/०८/२०२२

# प्रेस नोट

वसई विरार शहर महानगरपालीका अंतर्गत, एफ वार्ड पेल्हार प्रभाग समिती, जि. पालघर यांना अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागाने घेतले ताब्यात

| | | |
|---|---|---|
| अँन्टी करप्शन ब्युरो/घटक | :— | ठाणे |
| गुन्हा नोंद क्रमांक | :— | पेल्हार पोलीस स्टेशन, जि.पालघर |
| लोकसेवकाचे नांव व कार्यालय | :— | १) रुपाली राजेंद्र संखे, वय—५५ वर्षे, प्रभारी सहाय्यक आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालीका, एफ विभाग पेल्हार प्रभाग समिती<br>२) हितेश विनायक जाधव, वय —३० वर्षे, कनिष्ठ अभियंता, (कंत्राटी), वसई विरार शहर महानगरपालीका, एफ विभाग पेल्हार प्रभाग समिती.<br>३) गणेश प्रल्हाद झनकर, मजुर, (कंत्राटी), वसई विरार शहर महानगरपालीका, एफ विभाग पेल्हार प्रभाग समिती. जि.पालघर |
| मागितलेली लाचेची रक्कम | :— | ४०,०००/—रू |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | :— | — |
| थोडक्यात हकीगत | :— | यातील तक्रारदार बांधकाम व्यवसाईक आहेत. यातील लोकसेविका रुपाली राजेंद्र संखे या प्रभारी सहाय्यक आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालीका, एफ विभाग पेल्हार प्रभाग समिती,जि. पालघर २) हितेश विनायक जाधव, कनिष्ठ अभियंता (कंत्राटी) ३) गणेश प्रल्हाद झनकर, मजुर (कंत्राटी कामगार) आहेत.<br>यातील तक्रारदार व त्यांचा भाऊ यांनी झावरपाडा, नालासोपारा येथील दुकानाचे दुरुस्ती व उंची वाढविण्याचे काम घेतले होते. सदरचे बांधकामावर कारवाई करुन ते निष्काषित न करण्याकरीता लोकसेविका संखे व हितेश जाधव यांनी तक्रारदार यांचेकडे ५०,०००/—रु लाचेची मागणी करीत असले बाबत तक्रारदार यांनी दिनांक १६/०६/२०२२ रोजी रीतसर तक्रार दिली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १७/०६/२०२२ रोजी केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेविका संखे यांनी तडजोडीअंती ४०,०००/— रुपये स्विकारण्याचे मान्य करुन सदरची रक्कम कार्यालयात हजर असलेला गणेश झनकर यांचेकडे देण्यास सांगितले, गणेश झनकर, कंत्राटी मजुर यांनी दिनांक १८/०६/२०२२ रोजी व दिनांक २१/०६/२०२२ रोजीचे सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार व त्यांचे भाऊ यांचे कडून लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य करुन स्विकारण्याचा प्रयत्न केला. प्रस्तुत प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असुन लोकसेविका रुपाली संखे व हितेश जाधव, कंत्राटी कनिष्ठ अभियंता यांना ताब्यात घेण्यात आले आहे. |

**मार्गदर्शन अधिकारी—मा.श्री.डॉ.पंजाबराव उगले, सो.पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा—या लोकसेवका बद्दल तक्रार असल्यास अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---

१) संपर्क पत्ता :—लाप्रवि, ठाणे मध्यवर्ती कारागृहा समोर, ठाणे पश्चिम ४००६०१
२) संकेत स्थळ :—acbmaharashtra@mahapolice.gov.in
३) ई—मेल आयडी :—spacbthane@mahapolice.gov.in
४) अॅप्लीकेशन :—acbmaharashtra.net
५) टोल फ्री क्र. :— १०६४
६) दुरध्वनी क्रमांक :—०२२—२०८१३५९९

(सुरेश गणपत चोपडे)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे